Government of Maharashtra
Department of Cooperation, Marketing and Textiles
Asian Development Bank Assisted

# Maharashtra Agribusiness Network (MAGNET) Project

## Project Management Unit

386/2, 10th Floor, Sharada Chambers, Shankarsheth Road, Pune - 411 037
E-mail : mg@magnetadb.com, Tel: 020-24206000

## REQUEST FOR PROPOSAL

Maharashtra Agribusiness Network (MAGNET) Project invites applications and detailed project report from beneficiaries from Vidarbha, Marathwada and Konkan region of the State of Maharashtra for Post Harvest Management and Value Chain Development sub-projects of MAGNET focused crops viz; Banana, Guava, Pomegranate, Sapota, Custard Apple, Strawberry, Orange, Sweet lime, Okra, Chilly (Green and Red), Mango, Lemon, Cashew, Snake guard and floriculture crops.

Eligible beneficiary organizations includes Farmer Producer Organizations (FPO is farmers organizations registered under Company Act, State Co-op Societies Act, Farmer Groups promoted by ATMA /Cluster Level Federations (CLFs) promoted by MSRLM /Community Managed Resources Centers (CMRCs) promoted by MAVIM also including FPO Federations/ Associations) and Value Chain Operators (VCO - Non FPO Entities which may include aggregators / processors/ exporters/mid and large size retail organizations / Ag-tech or Fin-tech organizations working actively with producers and their collectives of any horticultural commodities).

This advertise is for FPO and VCO beneficiaries as mentioned above and limited to only Vidarbha, Marathwada and Konkan regions comprising of 5 Project Implementation Units of MAGNET project namely Nagpur, Amravati, Latur, Chhatrapati Sambhajinagar and Ratnagiri. The eligible applications will be evaluated on the basis of assessment criteria and first 15 sub projects (12 FPO and 03 VCO) each from Vidarbha, Marathwada and Konkan region will be selected separately. Thus, through this advertisement, a total of 45 sub-projects will be selected for the matching grant.

The maximum admissible grant for eligible project will be up to 60% of the eligible project cost. Detailed guidelines including eligibility criteria of beneficiaries, application forms, assessment criteria, document checklist, DPR template etc. are available on the website www.magnetadb.com of MAGNET project and www.msamb.com of Maharashtra State Agricultural Marketing Board, Pune. The beneficiary should register on website and download the application form, DPR template and other documents. The filled application form along with required documents as per checklist should be submitted in hard copy form and Detailed Project Report (DPR) along with supporting documents in soft copy form (Email or Pen drive) at the respective Project Implementation Unit (PIU), MAGNET Project and Divisional Office of Maharashtra State Agricultural Marketing Board - Ratnagiri / Chhatrapati Sambhajinagar / Latur / Amravati / Nagpur. Last date of submission of application is **12.08.2024 before 6.15 pm.** Corrigendum if any, in respect of this advertisement will be published on MAGNET and MSAMB websites only.

**Project Director, MAGNET, Pune.**

**SIZE : 12 x 15cm**

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
आशियाई विकास बँक अर्थसहाय्यीत

# महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प, पुणे

## प्रकल्प व्यवस्थापन कक्ष

३८६/२, १० वा मजला, शारदा चेंबर्स, शंकरशेठ रोड, पुणे – ४११०३७
ई–मेल – mg@magnetadb.com, फोन नं. – ०२०– २४२०६०००

# अर्ज व सविस्तर प्रकल्प अहवाल मागविण्यासाठी जाहिरात

महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पांतर्गत राज्यातील विदर्भ, मराठवाडा आणि कोकण विभागातील अर्जदारांकडून मॅग्नेट प्रकल्पामध्ये समाविष्ट असणाऱ्या केळी, पेरू, डाळिंब, चिक्कू, सिताफळ, स्ट्रॉबेरी, संत्री, मोसंबी, भेंडी, मिरची (हिरवी/लाल), आंबा, लिंबू, काजू, पडवळ व फुलपिके या पिकांसंबंधीत काढणी पश्चात व्यवस्थापन व मुल्यसाखळी विकास आदीबाबतच्या उपप्रकल्पांसाठी अर्ज व सविस्तर प्रकल्प अहवाल मागविण्यात येत आहेत.

पात्र लाभार्थ्यांमध्ये शेतकरी उत्पादक संस्था (कंपनी कायदा व सहकारी संस्था कायद्यांतर्गत नोंदणी झालेल्या शेतकरी संस्था, आत्मा नोंदणीकृत शेतकरी गट, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत प्रोत्साहित प्रभाग संघ, महिला आर्थिक विकास महामंडळाद्वारे प्रोत्साहित लोकसंचलित साधन केंद्र तसेच शेतकरी उत्पादक कंपनी आणि त्यांचे फेडरेशन्स असोशिएसन्स) आणि मुल्यसाखळी गुंतवणुकदार (कोणत्याही फलोत्पादन पिकांच्या उत्पादकाबरोबर तसेच उत्पादकांच्या कंपनी / सहकारी संस्था बरोबर सक्रियपणे कामकाज करीत असलेल्या संस्था कि जसे ॲग्रीगेटर/ प्रक्रियादार / निर्यातदार / मध्यम व मोठ्या रिटेल विक्रेता संस्था / कृषि तंत्र वा आर्थिक तंत्र संस्था) यांचा समावेश आहे.

सदरील जाहिरात हि उपरोक्त नमुदप्रमाणे शेतकरी उत्पादक संस्था व मुल्यसाखळी गुंतवणुकदार या अर्जदारांसाठी राहणार असून ती केवळ विदर्भ, मराठवाडा आणि कोकण विभागांतर्गत नागपूर, अमरावती, लातूर, छत्रपती संभाजीनगर व रत्नागिरी या ५ मॅग्नेट प्रकल्पाच्या प्रकल्प अंमलबजावणी कक्षाच्या कार्यक्षेत्रासाठी मर्यादित आहे. पात्र अर्जाचे मुल्यांकन निकषाच्या आधारे गुणांकन करण्यात येणार असून विदर्भ, मराठवाडा आणि कोकण विभागातील प्रत्येकी १५ उपप्रकल्प (१२ शेतकरी उत्पादक संस्था व ०३ मुल्यसाखळी गुंतवणुकदार) स्वतंत्रपणे निवडले जाणार आहेत. अशा प्रकारे या जाहिरातीद्वारे एकूण ४५ उपप्रकल्पांची अनुदानासाठी निवड केली जाणार आहे. अर्जदारांना पात्र प्रकल्प खर्चाच्या अधिकतम ६०% पर्यंत अर्थसहाय्य देय राहील. अर्ज करण्यासाठी आवश्यक असणारे पात्रता निकष, विहित नमुन्यातील अर्ज, मुल्यांकन निकष, कागदपत्रांची चेकलिस्ट, प्रकल्प अहवालाचा नमुना इ. बाबतची माहिती मॅग्नेट प्रकल्पाच्या www.magnetadb.com या संकेतस्थळावर व महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या (मराकृपमं) www.msamb.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुक अर्जदारांनी मॅग्नेट प्रकल्प व महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या संकेतस्थळावर नोंदणी करून विहीत नमुन्यातील अर्ज, प्रकल्प अहवालाचा नमुना व कागदपत्रांची चेकलिस्ट डाऊनलोड करावयाची आहे. अर्जदारांनी विहित नमुन्यातील अर्ज भरून चेकलिस्टप्रमाणे आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत जोडून मॅग्नेट प्रकल्पाच्या संबंधीत प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (पीआययु) तथा महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे विभागीय कार्यालय– नागपूर/अमरावती/ लातूर/ छत्रपती संभाजीनगर/रत्नागरी येथे छापील प्रतीत (हार्ड कॉपीमध्ये) व सविस्तर प्रकल्प अहवाल व आवश्यक कागदपत्रे सॉफ्ट कॉपीमध्ये (ईमेल अथवा पेन ड्राईव्ह द्वारे) सादर करावेत. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख १२/०८/२०२४ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत राहील. सदर जाहिराती संदर्भात शुद्धिपत्रके असल्यास ती केवळ मॅग्नेट व मराकृपमंच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

**प्रकल्प संचालक, मॅग्नेट, पुणे**

**SIZE : 12 x 15cm**